# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२५

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण २०, १९४७ (शके)**

**(१) महसूल मंत्री**
**(२) वने मंत्री**
**(३) आदिवासी विकास मंत्री**
**(४) कृषी मंत्री**
**(५) सामाजिक न्याय मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**
**(७) मदत व पुनर्वसन मंत्री**
**(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

### राज्यातील शेतकऱ्यांच्या विविध योजनांचे निधी व अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(१) * ५६६२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी मागील चार वर्षांपासून कृषी यंत्रे तसेच अवजारांवर मिळणारे अनुदान, सुक्ष्म सिंचन योजनेतील अनुदान, मुख्यमंत्री कृषी अन्न प्रक्रियेचे अनुदान, फलोत्पादन योजनेतील अनुदान, शेततळयासाठीचे अनुदान इत्यादी प्रकारचे अनुदान मिळण्याबाबत केलेले सुमारे ४८ लाख अर्ज शासनाकडे विना कार्यवाही पडून असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनुदानासाठी सुमारे ४४,००० कोटी रुपये आवश्यक असून केंद्र तसेच राज्य शासनाकडून किती निधी मिळू शकेल याचा अंदाज न घेता व या चार वर्षात संबंधित अर्जांची छाननी न करता तसेच लाभार्थ्यांची खात्री न करता त्यांचा कृषी समृद्धी योजनेत समावेश करून लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रलंबित कृषी योजनांसाठी प्रत्यक्ष किती निधी वितरित केला आहे व किती निधी अद्याप प्रलंबित आहे तसेच प्रलंबित अर्जांवर तातडीने कार्यवाही करून निधी वितरित व अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच पुढील आर्थिक वर्षात या योजनांसाठी अपेक्षित निधीचा आराखडा व मंजुरी प्रक्रियेची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत विविध योजनेंतर्गत प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर ४६,५८,३२० लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत ४६,५८,३२० लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली असून, अर्ज केलेले सर्व शेतकरी योजनांतर्गत निवड झाल्यानंतर प्रत्यक्ष लाभ घेत नाहीत. तथापि, निवड केलेल्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी तसेच लाभार्थ्यांची खात्री करूनच योजनांच्या निकषांनुसार पात्र व्यक्तींना लाभ देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. कृषी विभागांतर्गत विविध योजनांतर्गत बाबी संपृक्तता मोडवर उपलब्ध करून द्यावयाच्या झाल्यास त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. याकरीता कृषी समृध्दी योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(३) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता कृषी विभागांतर्गत विविध योजनांकरीता अर्थसंकल्पित निधी, प्रशासकीय मान्यता व वितरीत निधी याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

(रुपये लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | अर्थसंकल्पित निधी | प्रशासकीय मान्यता | वितरीत निधी |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान | २२५९०.०० | २०४१४.५८ | ८२६७.०० |
| २ | राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण | ४००००.०० | ४००००.०० | २००००.०० |
| ३ | प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना (PDMC) | ५०४८३.१७ | ५९६५८.३३ | २५१४१.७० |
| ४ | मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना (Topup) | ४००००.०० | ४००००.०० | १००००.०० |
| ५ | भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना | १०४५०.०० | १०४५०.०० | ६२७०.०० |
| ६ | मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे | १००००.०० | १००००.०० | ०.०० |
| ७ | मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना | ७५००.०० | ४५००.०० | ३१९७.७५ |
| ८ | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजना | १७५४१.६७ | १७०८३.३३ | ६८३३.३३ |

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेकरीता हिवाळी अधिवेशनात रुपये १२७.७१ कोटी निधीची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. तसेच केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत दुसऱ्या हप्त्याच्या निधी मागणीचा प्रस्ताव कृषी आयुक्तालयामार्फत केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

कृषी समृध्दी योजनेसाठी सन २०२५-२६ पासून पुढील ५ वर्षांमध्ये दरवर्षी रुपये ५००० कोटी अशी एकूण रुपये २५००० कोटीची तरतूद करण्यास दिनांक २९/०४/२०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अवैधरित्या वाळूची वाहतूक व विक्रीमुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान होत असल्याबाबत

**(२) * ४७६५ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवैधरित्या होत असलेला वाळू उपसा रोखण्याच्या आणि सामान्य नागरिकांना स्वस्त दरात रेती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाचे नवे वाळू धोरणानुसार ६०० रुपये प्रति ब्रास दराने रेती देण्याचे घोषित केले असतानाही आज बाजारात १० ब्रास रेतीसाठी १ लाख रुपये घेतले जात असल्याने परराज्यातून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या रेतीची वाहतूक होऊन तीची अधिक दराने राज्यात विक्री केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेतीच्या तुटवड्यामुळे बांधकाम क्षेत्रावर त्याचा परिणाम होऊन राज्याच्या विविध माध्यमातून जमा होणारा कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळत नसल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धोरण अंमलात आणल्यापासून वाळू तस्कर यांचेवर महसूल विभागाने कोणती कारवाई केली तसेच रेतीची अवैधरित्या होणारी वाहतूक रोखण्यासाठी व रेतीच्या तुटवड्यामुळे महसूल मिळत नसल्याने कोट्यवधी रुपयांची होणारी आर्थिक तुट भरून काढण्याकरीता शासनस्तरावर काही विशिष्ट उपाययोजना केली आहे काय तसेच सदरची उपाययोजना पूर्ण होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

दिनांक १९/०४/२०२३ च्या वाळू धोरणानुसार वाळू डेपोमधून रुपये ६००/- प्रती ब्रास दराने वाळूची विक्री करण्यात येत होती. सदर धोरण आता अस्तित्वात नाही.

दिनांक ०८/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ निर्गमित केले असून त्यामध्ये लिलावाद्वारे वाळू निर्गती करण्याच्या तसेच, परराज्यामधील वाळूच्या सनियंत्रण करण्याबाबतच्या तरतूदी विहित केल्या आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ अन्वये नदी/खाडी पात्रातील पर्यावरण अनुमती प्राप्त वाळू गटांचे लिलाव करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत राज्यात २२३ वाळू गटांचे लिलाव झाले असून त्यामधून रुपये २०३ कोटी इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे. तसेच, पर्यावरण अनुमती प्राप्त ५३० वाळू गटांच्या लिलावाची कार्यवाही सुरु आहे.

वाळू व इतर गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन व वाहतूक प्रकरणी, विविध कायदे/अधिनियम/नियम यान्वये फौजदारी कारवाई करण्याच्या अनुषंगाने दिनांक १७/०७/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

राज्यात दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/१०/२०२५ या कालावधीत ५२६० अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी ९९४ गुन्हे दाखल करुन १५३ आरोपींना अटक केली आहे व एम.पी.डी.ए कायद्यानुसार ९ कारवाया केल्या आहेत. तसेच रुपये ५०.८७/- कोटी इतक्या दंडाची वसूली केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यात विमुक्त जाती (अ) प्रवर्गातील बोगस जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळविणाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत

**(३) * ५७३९ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात विमुक्त जाती (अ) प्रवर्गातील बोगस जात वैधता प्रमाणपत्र घेऊन खऱ्या लाभार्थ्यांच्या जागेवर नोकरी मिळविल्याने सदर लाभार्थी नोकरी मिळण्यापासून वंचित राहत असल्याचे आढळून आले असून, बोगस प्रमाणपत्र घेऊन नोकरी मिळविणाऱ्या व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याबाबत संबंधित विभागाकडे मा.लोकप्रतिनिधी व नागरिकांनी वारंवार तक्रार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी चौकशी करुन राज्य शासनाकडे २ वर्षांपुर्वी पाठविलेल्या अहवालावर अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, तसेच ५० जात प्रमाणपत्रांच्या चौकशीमध्ये ४८ प्रमाणपत्रे बोगस असूनही शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बोगस जात वैधता प्रमाणपत्र धारकांविरुध्द व संबंधित यंत्रणेतील अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

तथापि, बुलढाणा जिल्ह्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि अनुसूचित जातीचे बोगस जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्राच्या तक्रारीच्या अनुषंगाने नेमण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी दिनांक २९/०५/२०२३ रोजी शासनास सादर केला आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

तत्कालीन उपायुक्त तथा सदस्य व तत्कालीन संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा जात पडताळणी समिती, बुलढाणा यांच्याविरूध्द या विभागाच्या दिनांक ०१/०७/२०२४ च्या ज्ञापनान्वये एकत्रित विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली आहे. सदर अधिकाऱ्यांविरूध्द सुरू करण्यात आलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

तसेच अर्जदार यांना निर्गमित केलेल्या जात वैधता प्रमाणपत्राविरूध्द भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ नुसार मा.उच्च न्यायालयात दाद मागण्याची तरतूद आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकासनिधी मान्यतेविना खर्च केल्याबाबत

**(४) * ५१०० श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने कार्यकारी परिषद आणि महाराष्ट्र राज्य कृषी परिषद यांची मान्यता न घेता २९ कोटी रुपयांचा खर्च संशोधन व बियाणे विकासाऐवजी बांधकामावर, विविध इमारतींच्या दुरुस्ती व नुतनीकरणासाठी कोणतीही निविदा प्रक्रिया न राबविता केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्याकरिता त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर त्रिसदस्यीय समितीने चौकशी पूर्ण करून अहवाल सादर केला आहे काय व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील अर्थिक व इतर गैरप्रकारांची चौकशी करण्याकरीता महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती.
सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून, सदर अहवालातील निष्कर्ष वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरा (ता.पातूर, जि.अकोला) येथील शासकीय जागेतून अवैधरित्या मुरुम उत्खनन होत असल्याबाबत

**(५) * ५६५६ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातूर (जि.अकोला) तालुक्यातील उमरा येथील झोपडपट्टी परिसरात धरणाच्या भिंतीलगत शासकीय जागेतून जेसीबी मशिनद्वारे मोठ्या प्रमाणात मुरुमाचे उत्खनन करुन टॅक्टरने अवैधरित्या वाहतूक सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गौण खनिज उत्खनन व अवैधरित्या होणारी वाहतूक रोखण्यासाठी जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना देखील याबाबत स्पष्ट आदेश असूनही, उमरा येथील महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने मुरुम माफियांनी उत्खननाच्या ठिकाणाला बेकायदेशीररित्या रस्त्याचे स्वरुप दिल्यामुळे पर्यावरणीय हानीसोबतच तेथील धरणालाही धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तेथील गावकऱ्यांनी वारंवार तक्रारी करुनही तलाठी यांनी दखल न घेतल्याने नागरिकांनी त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करुन मुरुम माफियांना सहाय्य करणाऱ्या तलाठ्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) नाही. तथापि, ग्राम महसूल अधिकारी, चान्नी व वरिष्ठ अभियंता, पंचायत समिती, पातूर यांच्या अहवालानुसार मौजे उमरा, ता.पातूर, जि.अकोला येथील ई-क्लास स.नं. ३८/३९/७९/२ मध्ये सहा ब्रास मुरुम उत्खनन झाले असून त्याच रस्त्यासाठी तिथेच वापरण्यात आलेले आहे. त्याची अन्य ठिकाणी वाहतूक झाल्याचे दिसून येत नाही.

तसेच, उपविभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे उपविभाग, जिल्हा परिषद, पातुर यांनी दिनांक २०/११/२०२५ अन्वये धरणाला कुठल्याही प्रकारची हानी पोहचली नसल्याचे स्पष्ट केले आहे.
(३) व (४) अशा प्रकरणी जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. परंतु मौजे उमरा, ता.पातूर येथील ई-क्लास स.न. ३८/३९/७९/२ मध्ये गौण खनिजाचे ६ ब्रास उत्खननावर नियंत्रण नसल्याने ग्राम महसूल अधिकारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव तहसिलदार, पातूर यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांना सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा व विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्या व मृत्यूच्या घटनांची चौकशी करणेबाबत

**(६)** * **४६६३ श्री.मिलिंद नार्वेकर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील आंबिस्ते येथील कै.दिगंबर पाडवी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील देविदास परशुराम नवले व मनोज सीताराम वड या अनुक्रमे दहावी व नववी इयत्तेत शिक्षण घेत असलेल्या दोन विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील झाडाला दोरी बांधून गळफास घेत आत्महत्या केली असल्याची घटना दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी विक्रमगड तालुक्यातील माण आश्रमशाळेतील दहावीच्या विद्यार्थ्याची आत्महत्या, जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या खुडेद येथील आश्रमशाळेतील चौथीतील विद्यार्थ्याचा आजारावर योग्य उपचार न झाल्याने माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यासुमारास झालेला मृत्यू, वाड्यातील

सोनाळे येथील न्यु इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थीनीचा सर्प दंशाने झालेला मृत्यू, परळी आश्रमशाळेत एका आदिवासी विद्यार्थीनीने मुख्याध्यापकाच्या दबावाला कंटाळून विष प्राशन करुन केलेली आत्महत्या अशा अनेक गंभीर घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस तसेच मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी संतप्त पालकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून सदरहू आत्महत्या व मृत्यू प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली तसेच मृत विद्यार्थ्यांच्या पालकांना नुकसान भरपाई वा आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे आहे.

सदर घटना दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी मध्यरात्री १.३० च्या सुमारास घडली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

अनुदानित आश्रमशाळा, माण, ता.विक्रमगड येथे दिनांक २०/०२/२०२२ रोजी इयत्ता १०वी मध्ये शिकणारा विद्यार्थी कै. अभिमन्यू काशिनाथ बुधर या विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

अनुदानित आश्रमशाळा, खुडेद येथील इयत्ता ४ थी मध्ये शिकणारा विद्यार्थी कै.स्वप्निल संजय रावते दिनांक ०३/०८/२०२३ रोजी उलटी जुलाब चालु झाल्याने रूग्णालयात भरती करण्यात आले परंतु उपचारादरम्यान मृत्यू झाला.

अनुदानित आश्रमशाळा, परळी, ता.वाडा येथील इयत्ता ९ वी मध्ये शिकणारी विद्यार्थीनी कै. गौरी शंकर मालक या विद्यार्थीनीचा सुट्टीवर असताना विषारी द्रव्य प्राषन केल्याने उपचारादम्यान मृत्यू झाला.

न्यू इंग्लिश स्कूल सोनाळे ही शाळा शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील असून येथील विद्यार्थीनीचा सर्पदंश झाल्याने मृत्यू झाल्याची बाब खरी आहे.
(३) अंशत: खरे आहे.

आंबिस्ते, माण व खुडेद या आश्रमशाळांमध्ये घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी पालकांकडून करण्यात आलेली नाही. तथापि, अनुदानित आश्रमशाळा, परळी येथील मुलीच्या विडलांनी शाळेचे मुख्याध्यापकांवर गुन्हा दाखल करण्याबाबत फिर्याद दाखल केली असून त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(४) अनुदानित आश्रमशाळा, आंबिस्ते या शाळेतील मुख्याध्यापक व अधीक्षक यांना कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबित करण्यात आले आहे. तसेच याबाबत पोलीस स्टेशन, वाडा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अनुदानित आश्रमशाळा, माण या शाळेतील घटनेच्या अनुषंगाने पालकांनी मुलाचा झालेला मृत्यू हा स्वत:हून केलेले कृत्य असल्याने त्याकरीता कोणालाही जबाबदार धरत नसल्याबाबत नमूद केले असल्याने याप्रकरणी कोणावरही कारवाई करण्यात आली नाही.

अनुदानित आश्रमशाळा, खुडेद येथील घटनेच्या अनुषंगाने पालकांनी तक्रार नसल्याचे जबाबात नमूद केल्याने याप्रकरणी कारवाई करण्यात आली नाही.

अनुदानित आश्रमशाळा, परळी येथील मुलीच्या वडिलांनी शाळेचे मुख्याध्यापकांवर गुन्हा दाखल करण्याबाबत फिर्याद दाखल केली असून त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

उपरोक्त प्रकरणांमध्ये दिवंगत विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रत्येकी २ लाख इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चकणापूर (ता.कळवण, जि.नाशिक) येथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्याचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याबाबत

**(७) * ५४८३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चकणापूर (ता.कळवण, जि.नाशिक) येथील आश्रमशाळेत इयत्ता तिसरीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याचा उपचाराअभावी मृत्यू झाला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मृत विद्यार्थ्याच्या पालकांना नुकसान भरपाई देण्याबाबत व नाशिक जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळेतील मूलभूत सोयी सुविधांचा आढावा घेऊन त्या पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) कु.रोहीत विलास बागुल इ.३ री (निवासी) हा विद्यार्थी उपजिल्हा रुग्णालय, कळवण, जि.नाशिक येथे दिनांक ०८/०९/२०२५ रोजी दुपारी १२.३० ते १.०० वाजेच्या दरम्यान मृत्यू झालेला आहे.

(२) कु. रोहीत यांचे मृत्यू प्रकरणी प्राथमिक चौकशी केलेली असून दिनांक ०८/०९/२०२५ अन्वये संबंधित मुख्याध्यापक व अधीक्षक यांना आदेशाच्या दिनांकापासून निलंबीत करण्यात आले आहे.

प्रस्तूत प्रकरणी अभोणा, ता.कळवण, जि.नाशिक येथील पोलीस ठाणे अंतर्गत गुरनं १९२/२०२५ बी.एन.एस कलम १०६(१), ३(५) दिनांक ०८/०९/२०२५ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

मृत विद्यार्थ्यांच्या पालकांना दिनांक ०९/०९/२५ रोजीच्या आदेशान्वये सानुग्रह अनुदान दोन लक्ष मंजूर करण्यात आलेले असून सदरची रक्कम प्रकल्प अधिकारी, कळवण कार्यालयाने (अदाता नोंदणी) सी.एम.पी. द्वारे संबंधित पालकास दिनांक १६/०९/२०२५ रोजी अदा केलेली आहे.

आश्रमशाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ या वर्षात १७ शासकीय आश्रमशाळांना आर.ओ. वॉटर प्युरीफायर बसविण्यात आले आहे. तसेच आयुक्तालयाच्या दिनांक ०२/०९/२०२५ रोजीच्या आदेशान्वये ४० आश्रमशाळांना वॉटर प्युरीफायर मशीन पुरवठा करण्यात आला आहे.

प्रकल्प कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय आश्रमशाळांना आयुक्तालयाकडून बाह्यस्त्रोताद्वारे परिचारीका (ANM) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी फिरते आरोग्य पथक व RBSK पथके नियुक्त असून प्राथमिक आरोग्य केंद्राकडून नियमित तपासणी करण्यात येते व संदर्भ सेवेसाठी पाठविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी महिला सक्षमीकरणासाठी दिल्या जाणाऱ्या ई-रिक्षा निकृष्ट दर्जाच्या असल्याबाबत

**(८) * ५१२९ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागामार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी देण्यात येणाऱ्या ई-रिक्षा निकृष्ट दर्जाच्या असून बॅटरी कमी कालावधीत निकामी होणे, वाहन सुरू न होणे, स्पेअर पार्ट्सची अनुपलब्धता तसेच वारंवार तांत्रिक बिघाड होऊन अनेक समस्या निर्माण होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील किती महिला लाभार्थींना सदर योजनेंतर्गत ई-रिक्षांचे वाटप करण्यात आले आहे, यासाठी एकूण किती निधी खर्च करण्यात आला आहे, सदर खरेदी कोणत्या कंपनीकडून, कोणत्या निविदा प्रक्रियेद्वारे व कोणत्या गुणवत्ता निकषांच्या आधारे करण्यात आली आहे, तसेच यासंदर्भातील किती तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत आणि त्यातील तक्रारींचे निवारण अद्याप झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपनी किंवा कंत्राटदारावर तसेच सदर ई-रिक्षा खरेदीस तांत्रिक मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच भविष्यात या योजनांमध्ये निकृष्ट दर्जाच्या वाहनांचा पुरवठा होऊ नये याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) आदिवासी विकास विभागामार्फत ई-रिक्षा वाटप करण्यासंबंधी स्वतंत्ररीत्या कोणतीही योजना राबविण्यात येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.पुणे) तालुक्यातील नायब तहसिलदार यांनी नियमबाह्यरित्या जमीन नोंदणी केल्याबाबत

**(९) * ५७९६ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्याचे नायब तहसिलदार यांनी पदाचा दुरुपयोग करून खोटे दस्तऐवज बनविणे, भोगवटा वर्ग २ ची जमीन भोगवटा वर्ग १ मध्ये बदलणे, तसेच शासकीय कार्यालयातील नोंदवहीतील पाने फाडून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चासकमान आणि भामासखेड धरणातील भूसंपादन प्रक्रियेदरम्यान, भोगवटा वर्ग २ ची जमीन भोगवटा वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याचा अधिकार केवळ जिल्हाधिकारी यांना असताना, नायब तहसिलदार यांनी अधिकाराचा गैरवापर करून खोटे शिक्के बनवून खोटा अहवाल तयार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात चौकशीअंती नायब तहसिलदार यांनी अनियमित व्यवहार केलेल्या जमिनी अद्याप शासनाच्या नावे पुन्हा नोंदविण्यात आलेल्या नाहीत तसेच गैरपध्दतीने जमिनींचे केलेले खरेदीपत्र व व्यवहार आजही वैध असल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काळुस गावातील संपादीत केलेल्या शेतकऱ्यांच्या अशा जमिनी जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांच्या नावे किंवा संबंधित मूळ शेतकऱ्यांना परत देण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) व (२) हे खरे आहे, मौजे खुरपुडी, ता.खेड येथील पुनर्वसनाच्या भोगवटदार वर्ग-२ च्या मिळकती वर्ग १ करणेसंदर्भात अधिकार नसताना आदेश पारीत करुन केलेल्या अनियमिततेप्रकरणी तत्कालीन नायब तहसिलदार (महसूल) खेड, जि.पुणे यांचेवर गुन्हा दाखल करुन निलंबनाची कारवाई करणेत आलेली आहे.

(३) हे खरे नाही. उक्त प्रकरणी मौजे खुरपुडी येथील संबंधित जमीन जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमिन) यांचे नावे दाखल करणेत आलेले आहे.

(४) प्रकल्पग्रस्तास बेकायदेशीररीत्या वाटप करण्यात आलेल्या मौजे काळूस येथील ग.क्र.१५८९ मधील क्षेत्रास जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमिन) यांचे नाव दाखल करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील अनधिकृत खडी क्रशरमुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान झाल्याबाबत

**(१०) * ५२०० ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.अहिल्यानगर) अनधिकृत खडी क्रशरमुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसूलाची हानी, पर्यावरणाचा ऱ्हास, वाईल्ड लाईफ प्रोटेक्शन ॲक्ट १९७२ चे उल्लंघन यासंदर्भात सन

२०२२ च्या हिवाळी अधिवेशनात उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मा.मंत्री (महसूल) महोदयांनी उपविभागीय अधिकारी, कर्जत, जि.अहिल्यानगर यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याबाबत सभागृहात घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मंत्री (महसूल) महोदयांच्या घोषणेच्या अनुषंगाने तत्कालीन उपविभागीय अधिकारी हे जबाबदार आढळून आल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे. हिवाळी अधिवेशन, २०२२ मध्ये कर्जत, जि.अहिल्यानगर अनधिकृत खडी क्रशरमुळे शासनाच्या करोडो रुपयांची हानी होणे, पर्यावरणाचा ऱ्हास होणे, वाईल्ड लाईफ प्रोटेक्शन ॲक्ट १९७२ चे उल्लंघन होणे या विषयासंदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक २०२ वरील चर्चेच्या वेळी मा.मंत्री (महसूल) यांनी उपविभागीय अधिकारी, कर्जत व तहसिलदार, कर्जत, जि.अहिल्यानगर यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याबाबत सभागृहाला आश्वस्त करण्यात आले होते.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तासखेडा (ता.रावेर, जि.जळगाव) येथील हतनूर कालव्याची माती अनधिकृतपणे उत्खनन व विक्री केल्याबाबत

**(११) * ५४३६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासखेडा शिवारातील (ता.रावेर, जि.जळगांव) हतनूर कालव्याची माती अनधिकृतपणे उत्खनन करून विक्री केल्याप्रकरणी संबंधित दोषींविरुध्द कारवाई होणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी जळगाव यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने हतनूर कालव्यातील मातीचे अवैध उत्खनन प्रकरणी संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जळगाव जिल्ह्यातील तासखेडा, ता.रावेर शिवारातील हतनूर धरण कालव्यातील मातीचे अवैध उत्खनन / वाहतूक प्रकरणी उपविभागीय अधिकारी पाटबंधारे उपविभाग, सावदा व क्षेत्रिय महसूल यंत्रणा यांचेमार्फत स्थानिक संयुक्त चौकशी करुन पंचासमक्ष पंचनामा केला आहे.

हतनूर कालव्याच्या खोदकामामधून निघालेली अतिरिक्त माती कालव्याच्या लगत संपादित क्षेत्रामध्ये साठवून ठेवण्यात आली आहे. त्यापैकी एकूण ४५६५ ब्रास मातीची अवैध वाहतूक अज्ञात व्यक्तीव्दारे झाल्याबाबत उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, सावदा यांनी तहसिलदार रावेर यांना कळविले आहे. सदरील मालमत्ता ही जलसंपदा विभागाच्या मालकीची असल्याने उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, सावदा यांना प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक २०/११/२०२५ च्या पत्रान्वये सहायक पोलीस निरीक्षक, सावदा यांना कळविले आहे. त्यानुसार अनधिकृत उत्खनन कोणी केले, हे निष्पन्न झाल्यानंतर या प्रकरणी नियमानुसार संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करुन त्यांच्या कुटूंबियांना मदत करण्याबाबत

**(१२) * ५८०२ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.सचिन अहिर, श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सावकारी कर्ज, इतर बँकेचे कर्ज, नापिकी, अतिवृष्टीमुळे माहे जानेवारी, २०२५ ते सप्टेंबर, २०२५ या कालावधीत एकूण ७८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून, त्यातील विदर्भातील नागपूर विभागात २९६ व मराठवाडा विभागातील २१२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय गुन्हे अहवाल (NCRB) २०२३ नुसार देशातील दर दोन शेतकरी आत्महत्यांपैकी सरासरी एक आत्महत्या महाराष्ट्रात झाली असून, राज्यात एकूण ६६६९ शेतकरी आत्महत्या नोंदविण्यात आल्या असून, त्यामध्ये ४१५० शेतकरी व २५१९ शेतमजूरांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी श्वेतपत्रिका जाहीर करून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासन स्तरावरून खालीलप्रमाणे विविध विभागामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत.

आत्महत्या रोखण्याकरीता शेतकऱ्यांच्या शेत मालाला योग्य भाव मिळणे, सिंचन सोई मध्ये वाढ करणे पीक/ शेतजमिनीची/ पशुधनाची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना तात्काळ वाटप करणे व समुदपदेशन केंद्रे संचलित करणे इत्यादी बाबी जिल्हा स्तरावर राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोरा बंदर व उरण (जि.रायगड) परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याबाबत

**(१३)** * **५६३५ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचे असलेले मोरा बंदर व उरण परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने सदर परिसराची सुरक्षा धोक्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोरा बंदर व उरण परिसरात गृह व बंदरे विभागाने सद्य:स्थितीत कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे व त्याचा तपशिल काय आहे, तसेच सीसीटीव्ही कॅमेरे नेमके किती कालावधी पासून बंद आहेत व कॅमेरे बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, संवेदनशील बंदरांतील सुरक्षा व्यवस्थेचा नियमित आढावा घेण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्याबाबत तसेच सदरहू कॅमेऱ्यांची दुरुस्ती किंवा पुनर्स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच उपरोक्त प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी/कंत्राटदार कंपनीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) व (२) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मोरा जेट्टी परिसरात लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुस्थितीत कार्यरत आहेत.

(३) मोरा, करंजा, बेलापूर ही संवेदनशील लहान बंदरे असून मोरा व बेलापूर बंदर हे CCTV कॅमेराच्या निगराणीखाली आहे. या बंदरांवर स्थानिक पोलीस ठाण्यांमार्फत सुरक्षेच्या दृष्टीने नियमित आढावा घेण्यात येतो.

तसेच सागरी सुरक्षा शाखेकडून दिवसा व रात्री मोरा, करंजा, बेलापूर या बंदराच्या सागरी परिसरामध्ये बोटींद्वारे सागरी गस्त केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत करण्याबाबत

**(१४)** * **५७७६ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ४५ हजारांवर विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार कार्डशी लिंक झाले नसल्यामुळे सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत करण्यास अडचण येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ४५ हजारांवर विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार कार्डशी लिंक करून तातडीने त्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) व (२) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांबाबत हे खरे नाही.

सन २०२२ -२३ ते २०२४-२५ या कालावधीतील बँक खाते आधार संलग्न नसल्यामुळे ३३७ पात्र अर्जदारांना प्रलंबित असलेला राज्य हिस्सा ४०% शिष्यवृत्तीची अदायगी करण्यात येत आहे. तसेच पात्र विद्यार्थ्यांचे आधारकार्ड व त्यांचे बँक खाते संलग्नीकृत नसणे या अनुषंगिक तांत्रिक अडचणींबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व त्याअंतर्गातील समाज कल्याण आयुक्तालय तसेच सर्व क्षेत्रिय कार्यालये यांच्यामार्फत वेळोवेळी बँक खाती आधार संलग्नीकृत करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच महाडीबीटी पोर्टलवरील विद्यार्थ्यांचे लॉगीनमध्ये याबाबत जलद दुवे व सुविधा देण्यात आलेल्या आहेत.

(३) सद्य:स्थितीत पात्र विद्यार्थ्यांना व त्यांच्या संबंधित महाविद्यालयांना राज्यशासनामार्फत राज्य हिस्सा ४०% विहीत वेळेत अदा केला जात आहे. मात्र केंद्र हिस्सा ६०% काही प्रमाणात विलंबाने अदा होत आहे. याकरीता देखील विभागामार्फत केंद्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करुन केंद्र हिस्सा ६०% तात्काळ वितरीत करण्यास विनंती करण्यात आली आहे.

-----------------

## महाराष्ट्राच्या जलधी क्षेत्रात परराज्यातील बोटी बेकायदेशीरपणे मासेमारी करीत असल्याबाबत

**(१५)** * **४७८८ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राच्या जलधी क्षेत्रात विदेशी व परप्रांतीय मच्छीमारांना मासेमारी करण्यास बंदी असतानाही आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, गोवा व गुजरात या परराज्यातील शेकडो मच्छीमार बोटी महाराष्ट्राच्या जलधी क्षेत्रात बेकायदेशीरपणे प्रवेश करीत असल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून परप्रांतातून येणाऱ्या ४२७ हॉर्सपॉवरपर्यंत क्षमतेच्या मासेमारी बोटी मालवण, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगडच्या जलधी क्षेत्रात लाखो टन मासळी नेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विदेशी व परप्रांतीय मच्छीमारांना मासेमारी करण्यास बंदी असतानाही महाराष्ट्राच्या जलधी क्षेत्रात बेकायदेशीरपणे प्रवेश करणाऱ्या परप्रांतीय मच्छिमार नौकांना रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) हे अंशत: खरे आहे. सन २०२५ या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्याच्या जलधी क्षेत्रात बेकायदेशीरपणे प्रवेश केलेल्या एकूण ०८ मच्छिमार नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत कारवाई करण्यात आली असून रुपये ३४.८८ लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(२) परराज्यातील नौकांनी राज्याच्या जलधी क्षेत्रात घुसखोरी केल्यास अशा नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ मधील कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे. सन २०२१-२२ पासून परप्रांतिय ३४ नौकांवर कारवाई केली असून रुपये २.५१ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आतकोली भादाणे (ता.मुरबाड, जि.ठाणे) गावालगत अनधिकृत दगड खाणी चालविल्या जात असल्याबाबत

**(१६) * ५५०२ श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आतकोली भादाणे (ता.मुरबाड, जि.ठाणे) गावालगत डंम्पिंग ग्राऊंडजवळ पिसे वाशेरे, चिराडपाडा व परिसरातील तलाठी हद्दीत समृध्दी महामार्गापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर सर्व्हे नंबर १७२/१ मधील शासकीय महसूल जमीन तसेच खाजगी जमीन वापरुन अनधिकृत दगड खाणी चालविल्या जात असून दगड फोडण्यासाठी स्फोटकांचा वापर केल्याने परिसरातील घरांना धोका निर्माण होत असल्याचे तसेच शेतीचे नुकसान होऊन प्रदूषणही वाढले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सुरु असलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनधिकृत दगड खाणी चालविणाऱ्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच शेतकऱ्यांची झालेली लाखो रुपयांची नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील मौजे भादाणे येथील स.नं. १७२/१ क्षेत्र १७/४३/०० हे.आर. ही जमीन खाजगी मालकीची असून या मिळकतीच्या काही क्षेत्रावर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्यामार्फत दिलेल्या तात्पुरत्या परवान्यानुसार दगड उत्खनन करण्यात येत आहे.

प्रस्तुत मिळकतीवरील उत्खननाच्या अनुषंगाने स्फोटकांचा वापर केल्याने घरांना तडे व शेतीचे क्षेत्र नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) मौजे भादाणे येथील स.नं. १७२/१ क्षेत्र १७/४३/०० हे.आर. या मिळकतीमध्ये १० पोट हिस्से असून नेमक्या कोणत्या पोट हिस्यामधून सदर उत्खनन होत आहे. याबाबत मोजणी करणे व उत्खनाची ईटीएस मोजणी करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी अनुक्रमे उप अधीक्षक भूमी अभिलेख, भिवंडी व उप संचालक खनिकर्म संचलनालय, कोल्हापूर यांना कळविले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

मौजे भादाणे येथील स.नं. १७२/१ या गटामधून उत्खननाबाबत ग्राम महसूल अधिकारी आमने यांनी मोजमापे करुन पंचनामा सादर केला असून त्यानुषंगाने तहसिलदार, भिवंडी यांनी नोटीस संबंधितांना बजावली आहे.

भिवंडी तालुक्यातील पडघा महसूल मंडळाच्या हद्दीत येणाऱ्या मौजे आतकोली, भादाणे पठारावर अनधिकृत गौणखनिज उत्खनन होऊ नये याकरीता गुरचरण व सरकारी जमिनींमध्ये पांढऱ्या रंगाचे पट्टे मारुन दगडखाणींना येण्याचा रस्ता चर खोदून बंद केला आहे. तसेच, अनधिकृत दगड उत्खननाबाबत गस्त पथक नेमले असून त्या पथकामार्फत कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासींच्या जमिनी खाजगी कंपन्यांना भाडेतत्त्वावर देण्यासाठी नवीन कायदा आणण्याची घोषणा केल्याबाबत

**(१७) * ४८१५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने आदिवासींच्या जमिनी खाजगी कंपन्यांना भाडेतत्त्वावर देण्यासाठी नवीन कायदा आणण्याची घोषणा केली असून, हा निर्णय आदिवासींच्या शोषणापासून त्यांचे रक्षण करण्यासाठी बनवलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ कलम ३६अ आणि संबंधित नियमांचे उल्लंघन करणारा असून सदरहू नवीन कायद्याविरुध्द आदिवासी संघटना तीव्र विरोध दर्शविण्याकरीता ठिकठिकाणी आंदोलने करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खनिज संपत्तीने समृध्द जमिनी खाजगी कंपन्यांना दिल्यास आदिवासींचे अस्तित्व आणि संस्कृती धोक्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासींच्या जमिनी बिगर-आदिवासींना हस्तांतरित किंवा भाडेपट्ट्याने देण्यास प्रतिबंध करणारी तरतूद आदिवासी संरक्षण कायद्यांतर्गत (जसे की PESA कायदा, ५ वा आणि ६ वा अनुसूची) पूर्वीपासून अस्तित्वात असूनही आदिवासींना भूमिहीन करणाऱ्या संरक्षक कायद्यांना कमकुवत करण्यामागे शासनाचे धोरण काय आहे, तसेच भाडेतत्त्वाच्या नावाखाली आदिवासींच्या जमिनी हडप करण्यासाठी सदरहू कायदा वापरला जाणार नाही याची शासन हमी देणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आदिवासींच्या जमिनी खाजगी कंपन्यांना भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ व ३६-अ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीतील व्यक्तींकडून करण्यात येणाऱ्या वहिवाटीच्या हस्तांतरणावर निर्बंध लादण्यात आलेले आहेत.

तसेच, कलम ३६-अ (१)अ मधील तरतुदीनुसार जमातीतील व्यक्तींच्या जमिनी ५ वर्षांपेक्षा अधिक नसणाऱ्या कालावधीसाठी पट्टयाने किंवा गहाण ठेवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक आहे.

तर, पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी जर जमातीतील व्यक्तींच्या जमिनी भाडेपट्टयाने अथवा गहाण ठेवावयाच्या असल्यास त्यास राज्य शासनाची पूर्व मान्यता आवश्यक आहे, अशी स्पष्ट तरतूद कायद्यामध्ये आहे. अनुसूचित जमातीच्या जमिनी खाजगी कंपन्यांना भाडेपट्टयाने देण्याच्या अनुषंगाने सदर तरतूदींमध्ये सद्य:स्थितीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालाड (प.), मुंबई येथील अक्सा समुद्र किनाऱ्यावरील पदपथ अनधिकृत असल्याबाबत

**(१८) * ५०४० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पश्चिम) मुंबई येथील महाराष्ट्र सागरी मंडळाने अक्सा समुद्र किनाऱ्याचा सुशोभिकरण प्रकल्प हाती घेतला असून याकरीता १० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला असून, सदर प्रकल्पाअंतर्गत बांधलेले समुद्र पदपथ हे अनधिकृत असल्याचे तसेच किनारा नियमन क्षेत्रामध्ये (सीआरझेड) उल्लंघन झाल्यामुळे तेथील रहिवाशांनी उक्त पद पथाबाबत आक्षेप घेतला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प हरीत लवादाकडे न्यायप्रविष्ट असताना व प्रकल्पाचे काम योग्य नसल्यामुळे उक्त प्रकल्पाला तीन वेळा परवानगी नाकारण्यात आली असतानाही सागरी मंडळाने चौथ्या वेळी परवानगी मिळवून कामाला स्थगिती मिळेपर्यंत ९०% काम पूर्ण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून त्याअनुषंगाने नियमांचे उल्लंघन करून समुद्री पदपथ विकसित करणाऱ्या कंत्राटदारावर तसेच अनधिकृत परवानगी देऊन निधी मंजूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) हे खरे नाही.

मालाड पश्चिम, मुंबई येथे अक्सा बीच सुशोभीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला असून प्रकल्पासाठी महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) व राज्य पर्यावरण प्रवाह मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) यांची आवश्यक पर्यावरणीय परवानगी तसेच केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान शाळा (CWPRS), पुणे यांचे अभिप्राय घेऊनच सदर काम हाती घेण्यात आले आहे. तद्नंतर

सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. तसेच सदर ठिकाणी स्थानिक रहिवाश्यांनी याबाबत आक्षेप घेतलेला नाही. मात्र सदर कामासंदर्भात Nat connect foundation या पर्यावरणवादी संघटनेने मा.राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडे मे, २०२३ मध्ये आक्षेप नोंदविला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे ९५% आणि किनारी सुशोभीकरणाचे २५% काम पूर्ण झाल्यावर मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी दिनांक १/१२/२०२३ रोजी पुढील आदेशापर्यंत काम न करण्याचे आदेश दिले होते. तद्नंतर मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी यासंदर्भात दिनांक १६/०९/२०२५ रोजी दिलेल्या अंतिम निर्णयासंदर्भात महाराष्ट्र सागरी मंडळातर्फे मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल करण्यात आले. या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २०/११/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.राष्ट्रीय हरित लवादाचे दिनांक १६/०९/२०२५ रोजीच्या आदेशाला स्थगिती दिली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी विद्यापीठांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९)** * **५१४८ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.किशोर दराडे, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील मंजूर असलेल्या ३४४७ जागांपैकी अद्यापही २१७३ जागा रिक्त असून याखेरीज महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे अध्यक्षपद व त्याचप्रमाणे सेवा प्रवेश मंडळांचेही अध्यक्षपद मागील सहा महिन्यांपासून रिक्त असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांसह राज्यातील अन्य प्रमुख कृषी विद्यापीठांमध्ये एकूण ६३८३ विविध पदे रिक्त असल्याने शिक्षण आणि संशोधन विषयक कामकाजावरही परिणाम होत असून आकृतीबंधाला मंजुरी न मिळाल्याने प्रलंबित नोकरभरती आणि प्रशासकीय अनास्थेमुळे विद्यापीठांचा दर्जा खालावत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या किती जागा रिक्त आहेत,

(४) असल्यास, सदर कृषी विद्यापीठांमध्ये अद्यापही कालबाह्य अभ्यासक्रम शिकविले जात असून प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना वेळेत बदली न दिल्यामुळे राज्यातील विद्यापीठांमध्ये कुलगुरुपदी पात्र प्राध्यापक मिळत नसल्याने इतर राज्यातील प्राध्यापकांची कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील चारही प्रमुख विद्यापीठांमधील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे सद्य:स्थितीत २२३५ इतकी पदे रिक्त आहेत.

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे अध्यक्षपद रिक्त नसून मा.मंत्री (कृषी) हे सदर परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

सेवा प्रवेश मंडळाचे अध्यक्षपद सद्य:स्थितीत रिक्त आहे.

(२) व (३) राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर संवर्गातील एकूण ७१९९ पदे रिक्त आहेत.

या रिक्त पदांचा कार्यभार इतर कार्यरत शिक्षकवर्गीय/ शिक्षकेतर अधिकारी/ कर्मचारी यांना देवून, तसेच, कंत्राटी अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून त्याद्वारे विद्यापीठांचे कामकाज प्रभावीपणे पार पाडले जात आहे.

(४) कृषी विद्यापीठांत सहाव्या अधिष्ठाता समितीच्या सन २०२४-२५ मधील अहवाल/ शिफारशीनुसार सुधारित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकविला जात आहे.

राज्यातील कृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंची नियुक्ती ही विद्यापीठांचे कुलपती तथा मा.राज्यपाल महोदय यांच्याकडून केली जाते.

सद्य:स्थितीत, चारही कृषी विद्यापीठांतील कुलगुरू पदांवर कार्यरत असलेल्या कुलगुरूंपैकी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील कुलगुरू वगळता, अकोला व कोकण कृषी विद्यापीठांचे कुलगुरू हे महाराष्ट्रातील आहेत. तर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील कुलगुरू पदाची निवड प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली असून मा.राज्यपाल महोदय यांनी राहुरी कृषी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी राज्यातील श्री.विलास खर्चे यांची नियुक्ती केली आहे.

(५) राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या आस्थापनांवरील पदांचा आकृतिबंध अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

त्यानुसार, या विभागाकडून वित्त विभागाकडे, आकृतिबंध मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे.

आकृतिबंध अंतिम झाल्यावर शासनाच्या पदभरती विषयक धोरणानुसार रिक्त पदे भरण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## मौजे नऱ्हे (ता.हवेली, जि.पुणे) फॉरेस्ट परिसरात वन विभागाकडून अनधिकृतपणे रस्त्याचे बांधकाम करण्याकरीता वृक्षतोड केल्याबाबत

**(२०)** * ४९८७ **श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नऱ्हे (ता.हवेली, जि.पुणे) फॉरेस्ट परिसरात वन विभागाने कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अंदाजे १२०० मीटर लांबीचा रस्ता बनविण्याकरीता मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत उल्लंघन केल्याप्रकरणी दोषी वन अधिकारी व ठेकेदार यांचेवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

तथापि, राज्य योजना वनातील सर्व्हेक्षण व सिमांकन (४४०६-००५३) शिर्षांतर्गत मौजे नऱ्हे, ता.हवेली, जि.पुणे फॉ.स.नं. १७ येथे सिमाभिंतीचे काम करताना विनापरवाना ग्लिरिसीडीया या प्रजातीची वृक्षतोड केले प्रकरणी संबंधित आरोपी नामे अभिजीत सुहास मंडल यांचेवर भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये वनगुन्हा क्र. ३९/२०२५ नोंदविण्यात आलेला आहे. सदर गुन्हे प्रकरणी अंतिम आदेशान्वये आरोपी यांचेकडून एकूण रक्कम रुपये १०,४८२/- इतके नुकसानभरपाई वसुलीचे आदेश झालेले आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विरार-अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पातील बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळणेबाबत

**(२१)** * **४९०१ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेमध्ये पनवेल तालुक्यातील ४४ गावांच्या जमिनीचे क्षेत्र बाधित होत असून मागील दीड वर्षात भूसंपादनातील दरनिश्चितीची प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने येथील प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात भूसंपादन न करता, शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला न देता त्याआधीच जमिनीच्या सातबाऱ्यावर शिक्के मारण्यात आलेले असून भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झालेली नसताना भूसंपादन करण्यात येणाऱ्या व न करण्यात येणाऱ्याही सर्व जमिनींचे खरेदी-विक्री व्यवहार शासनाकडून बंद करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पासाठी ज्या शेतकरी बांधवांच्या जमिनी भूसंपादीत करण्यात येणार आहेत त्यांना मोबदला कधीपर्यंत मिळणार आहे तसेच आतापर्यंत किती प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना मोबदला देण्यात आलेला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेमध्ये पनवेल तालुक्यातील ४४ गावातील क्षेत्र बाधित होत असून बाधित क्षेत्राची विहीत कार्यपध्दतीनुसार दरनिश्चिती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

तसेच महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे कलम १८(१) ची अधिसुचनेनुसार संपादनामध्ये समाविष्ट असलेल्या जमिनी सर्व भाराराहित शासन निहीत झाल्याने अशा जमिनींच्या इतर अधिकार क्षेत्रात "प्रस्तावित विरार-अलिबाग बहुउद्देशिय मार्गिकेसाठी भुसंपादनात समाविष्ट" असे शेरे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या भूसंपादन संस्थेकडून निधी प्राप्त होताच उर्वरीत शेतकऱ्यांना निधी वाटपाची कार्यवाही करण्याचे नियोजीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिलवडी (ता.पलूस, जि.सांगली) बाजारपेठेतील व्यापाऱ्यांचे कृष्णा नदीला आलेल्या पुरामुळे नुकसान झाल्याबाबत

**(२२) * ५०१७ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कृष्णा नदीला आलेल्या पुरामुळे भिलवडी बाजारपेठेतील व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यापाऱ्यांचे पुरामुळे मोठे नुकसान झाल्यानंतर शासनाने नुकसान भरपाई म्हणून दिलेली रक्कम अत्यंत तुटपुंजी असून या मदतीमध्ये जीएसटी अधिकाऱ्यांनी केलेला सर्व्हे चुकीचा असल्याचा आरोप संबंधित नुकसानग्रस्तांनी केला असल्याने उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुरग्रस्तांना योग्य ती मदत देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) अंशत: खरे आहे.

माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) जीएसटी कर्मचाऱ्यांनी पंचनाम्यामध्ये दिलेल्या मुल्यांकनाप्रमाणे व महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२४/प्र.क्र.१८२/म-३, दिनांक ०८ ऑगस्ट, २०२४ मधील तरतुदीनुसार भिलवडी गावामधील दुकान/टपऱ्यामध्ये पाणी शिरलेले एकूण १४८ पंचनामे प्राप्त झाले त्यापैकी १२० लाभार्थी यांचे खातेवर रक्कम रुपये ७,५३,३७५/- जमा करण्यात आले आहे. उर्वरित २४ लाभार्थी यांचे रक्कम रुपये १,२८,०००/- (एक लाख अठ्ठावीस हजार मात्र) इतके अनुदान शासन निर्णयातील तरतुदीनुसार आवश्यक कागदपत्रे प्राप्त न झाल्याने अदा करणेत आलेली नाही. संबंधित लाभार्थी यांना तहसिलदार पलूस यांनी पत्र दिनांक १८/०९/२०२५ रोजी व दि ०३/१०/२०२५ रोजी कागदपत्रांची पूर्तता करणेस कळविण्यात आलेले आहे. मात्र, अद्यापही संबंधित नुकसानग्रस्त टपरी/दुकानदार यांनी कागदपत्रांची पूर्तता न केल्याने अनुदान अदा करता आले नाही. बाधित लाभार्थी यांचेकडून कागदपत्राची पूर्तता करुन अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित ०४ लाभार्थी हे अपात्र करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना विमा भरपाई मिळाली नसल्याबाबत

**(२३) * ५२६० श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक २३३७५ ला दिनांक २ जुलै, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विमा हप्त्यापोटी हजारो कोटी रुपयांची रक्कम दिली नसल्याने शेतकऱ्यांना विमा भरपाई मिळालेली नाही, परिणामी सन २०२३-२०२४ मधील खरीप व रब्बी हंगामातील विमा भरपाई पासून शेतकरी वंचित राहिले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ७५.८४ लाख शेतकऱ्यांना दिनांक २४ मे, २०२४ अखेर रुपये ३९४१.१९ कोटी अंतरीम नुकसान भरपाई मंजूर असून त्यापैकी ६३.६३ लाख शेतकऱ्यांना रुपये ३३२२.२७ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२३-२०२४ मधील खरीप व रब्बी हंगामातील उर्वरीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) खरीप, २०२३ मध्ये विविध जोखीम बाबींकरीता दिनांक २४/०५/२०२४ अखेर एकूण ७५.८४ लाख शेतकऱ्यांना रुपये ३९४१.१९ कोटी अंतरिम नुकसान भरपाई मंजूर असून, त्यापैकी ६३.६३ लाख शेतकऱ्यांना रुपये ३३२२.२७ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आली होती.

मात्र, त्यानंतरच्या कालावधीत दिनांक २०/११/२०२५ अखेर पर्यंत, खरीप हंगाम, २०२३ व रब्बी हंगाम, २०२३-२४ करीता एकूण रुपये ८५६२.२० कोटी इतकी अंतरिम नुकसान भरपाई मंजूर असून, त्यापैकी रुपये ८५२७.७६ कोटी इतक्या रकमेच्या नुकसान भरपाईचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरीत नुकसान भरपाई वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) या तालुक्यांमधील पांदण रस्त्यांची कामे नियमबाह्य होत असल्याबाबत

**(२४) * ५२५० श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) या तालुक्यांमधील एकूण १८७ पांदण रस्त्यांची कामे नियमबाह्य होत असल्यामुळे त्याची चौकशी करून कार्यवाही करणेबाबतचे निवेदन मा.मंत्री (महसूल) यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १८७ पांदण रस्त्यांच्या कामांमध्ये नियमानुसार साहित्य न वापरताच निकृष्ट दर्जाची कामे करून देयके मंजूर करुन घेण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन पांदण रस्त्यांची नियमबाह्य कामे करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा.मंत्री (महसूल) यांना स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत प्राप्त झालेले निवेदन “चौकशी करून उचित कार्यवाही करावी” या मा.मंत्री (महसूल) यांच्या निर्देशासह जिल्हाधिकारी, वर्धा यांना मा.मंत्री (महसूल) यांच्या कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

(३) मा.मंत्री (महसूल) यांच्या कार्यालयामार्फत प्राप्त निवेदनातील विषयाबाबत जिल्हा परिषद वर्धा आणि आर्वी, आष्टी व कारंजा या तालुक्यांचे तहसिलदार यांच्याकडून जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याव्दारे अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांना थकित अनुदान वितरित करण्याबाबत

**(२५) * ५४३३ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील समाजकल्याण विभागामार्फत विविध जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जाती, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनमान्य वसतिगृहे (छात्रालये) चालविण्यात येत असून, राज्यातील इतर जिल्ह्यांना समाजकल्याण विभागाकडून वसतिगृहांचे अनुदान वेळेवर वितरित केले जाते परंतु नंदुरबार या आदिवासी दुर्गम जिल्ह्यातील वसतिगृहांचे अनुदान वेळेवर मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी व दुर्गम भाग असल्याने जिल्ह्यातील वसतिगृहांना अनुदान वितरणात प्राधान्य देण्यासाठी तसेच नंदुरबार जिल्ह्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातील थकित अनुदान वितरणासाठी समाजकल्याण विभागाने वित्त विभागाशी समन्वय साधून निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) सन २०२५-२६ साठी वसतिगृहासाठी कार्यरत असलेले लेखाशीर्ष २२२५-F१३८ या लेखाशिर्षावरती रुपये ३००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. त्यापैकी रुपये १८०.०० लक्ष इतकी तरतूद वितरित केलेली आहे. सदर तरतूद अपुरी असल्याने आयुक्त समाजकल्याण, पुणे कार्यालयामार्फत केलेल्या मागणी नुसार अनुसुचित जाती प्रवर्गातील अनुदानित वसतिगृहांसाठी रुपये २६५७.५१ लक्ष इतकी तरतूद उपलब्ध करून देण्यासाठी वित्त विभागाकडे पुरवणी मागणी सादर केली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील विहिरींची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत

**(२६) * ४६९९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०२१ पासून मंजूर झालेल्या ७,८७१ सिंचन विहिरींपैकी केवळ ५,५५५ विहिरींचीच कामे पूर्ण झालेली असून, उर्वरित २,३१६ विहिरींची कामे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर, पारनेर, श्रीरामपूर, श्रीगोंदा, जामखेड, राहुरी, संगमनेर, अकोले आदी तालुक्यातील २,३१६ सिंचन विहिरींची कामे अद्याप प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रलंबित विहिरींच्या कामांच्या चौकशीसाठी शासनाने विशेष समिती नेमली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित ठेकेदार व विभागीय अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच विहिरींची प्रलंबित कामे पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

(२) अहिल्यानगर जिल्ह्यात मजुरांच्या उपलब्धते अभावी विहिरींची कामे अद्याप प्रलंबित आहेत.

(३) जिल्ह्यामध्ये अपूर्ण असलेल्या विहिरींची मजुरांच्या उपलब्धतेनुसार प्राथम्याने कामे पूर्ण करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## फुलंब्री (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील रोजगार हमी योजनेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२७) * ५२५३ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील ३३ गावांमधील ९६ पाणंद रस्त्यांच्या कामांवर मजुरांचा एकच ग्रुप फोटो दाखवून तब्बल ५ कोटी १८ लाख रुपये अकुशल कामाच्या खर्चातून काढून गैरव्यवहार केल्याच्या प्रकरणात नव्याने संपूर्ण चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फुलंब्री तालुक्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत पाणंद रस्त्यांच्या कामाच्या निधीमध्ये गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) प्राथमिक चौकशीत दोषी आढळून आलेल्या ७ ग्रामपंचायतींच्या ग्रामरोजगार सेवकांना कमी करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींना निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, ०३ ग्रामपंचायतीतील पाणंद रस्त्यांच्या कामांमधील अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचा खुलासा मागविण्यात आला असून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वर्ग-२ जमिनींचे रहिवासी इमारतीमध्ये रुपांतरण करताना नजराणा शुल्क भरला जात नसल्याबाबत

**(२८) * ४८६४ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक वर्ग - २ भोगवटादार जमिनी आता दाट लोकवस्तीच्या परिसरात आल्याने अशा जमिनी या वाणिज्यक, औद्योगिक अथवा वाणिज्यिक रहिवास वापराकरीता (Residential Cum Commercial Complex) मोठ्या प्रमाणात नियमानुसार भोगवटादार वर्ग २ ते वर्ग १ केल्या जात असल्याने अशा जमिनीचा संवर्ग बदलताना नियमानुसार आवश्यक नजराणा शुल्क भरले जात नसल्याचे अनेक प्रकरणात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई व पुणे सारख्या शहरात अनेक प्रकरणात जमिनीचा नजराणा भरण्यात आला असून त्यावर झालेल्या बांधकामांना यातून वगळण्यात आल्याने या ठिकाणी शासनाला देय असलेला कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळत नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू चौकशीकरीता शासनामार्फत विशेष पथक नेमण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

शासनाने कब्जेहक्काने तसेच भाडेपट्ट्याने कृषी/निवासी/वणिज्य/औद्योगिक प्रयोजनासाठी प्रदान केलेल्या शासकीय जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्याबाबतचे महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करणे) नियम, २०२५ शासन अधिसूचना दिनांक ०४/०३/२०२५ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत.

सदर नियमान्वये कृषी/ निवासी/वाणिज्य/औद्योगिक प्रयोजनाकरीता कब्जेहक्क वर्ग-२ अथवा भाडेपट्टयाने प्रदान केलेली मिळकत भोगवटादार वर्ग-१ या संवर्गात रूपांतरण करतेवेळी जमिनीच्या विविध प्रयोजनानुसार जमिनीचे प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील मूल्यदरानुसार दिनांक ३१/१२/२०२५ पर्यंत लागू असलेल्या सवलतीच्या ५ टक्के ते ५० टक्के या दराने रूपांतरण अधिमुल्य आकारण्यात येत आहे.

तसेच, लागू असलेल्या प्रकरणी शर्तभंग नियमित करण्यासाठी विहीत दराने नजराणा आकारण्यात येतो. विहित नियमानुसार आवश्यक नजराणा शुल्क भरले जात नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

सदर नियम हे शासनाने कब्जेहक्काने अथवा भाडेपट्ट्याने कृषी/निवासी/वणिज्य/ औद्योगिक प्रयोजनासाठी दिलेल्या शासकीय जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये अधिमूल्य आकारुन रुपांतरण करण्याबाबतचे असल्यामुळे, सदर रुपांतरण करताना जमिनीवरील बांधकाम विचारात घेतले जात नाही. तथापि, सदर शासकीय जमिनीवर जर सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय अनधिकृत बांधकाम करुन शर्तभंग केलेला असल्यास नियमानुसार सदरचा शर्तभंग नियमानुकूल करताना विहीत नजराणा भरल्याशिवाय जमिनीचा धारणाधिकार भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये करता येत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी विभागाच्या महाडिबीटी पोर्टलवर नोंदणी करताना शेतकऱ्यांना अडचणी येत असल्याबाबत

**(२९) * ५७३२ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन महाडिबीटी पोर्टलवरुन शेतकऱ्यांना यांत्रिकीकरण, ठिबक सिंचन, फळबाग लागवडीसाठी अनुदान देत असून महाडिबीटी वरील तांत्रिक अडचणीमुळे कागदपत्रे अपलोड होत नसल्याने मुदती अखेर निवडलेला अर्ज बाद होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहिती घेवून सदरील सेवा सुरळीत होत नाही तोपर्यंत निवडलेली नावे ग्राह्य धरण्यात यावीत अशी शेतकऱ्यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) अंशत: खरे आहे. महाडिबीटी पोर्टल ॲग्रिस्टॅक शेतकरी क्रमांकाशी जोडल्यामुळे काही लाभार्थ्यांना कागदपत्रे अपलोड करण्यासाठी अडचण येत होती.

(२) हे खरे नाही.

(३) महाडिबीटी पोर्टलवरील कागदपत्रे अपलोड करण्याबाबतच्या अडचणी विचारात घेता विहित कालावधीमध्ये कागदपत्रे अपलोड न केल्यास शेतकऱ्यांचे नाव निवड यादीतून आपोआप रद्द करण्याची प्रक्रिया सद्य:स्थितीत बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे निवड झालेले सर्व लाभार्थी त्यांची कागदपत्रे अपलोड करुन विविध योजनांचा लाभ घेण्याच्या प्रक्रियेत सहभागी होऊन लाभ घेऊ शकतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा फुले मागासवर्ग महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ व रोहिदास चर्मोद्योग महामंडळांमध्ये कर्ज व अनुदान वाटपात अनियमितता झाल्याबाबत

**(३०) * ५१०५ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील दुर्बल घटकांना व्यवसायाकरीता अल्प व्याजदरात कर्ज देऊन स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया सक्षम करण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या महात्मा फुले मागासवर्ग महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ व रोहिदास चर्मोद्योग महामंडळ या तीन महामंडळांमध्ये अनुदान व कर्ज वाटपामध्ये गैरव्यवहार झाला असून एकाच घरात चार ते पाचवेळा कर्ज वाटप झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान व कर्ज वाटपात झालेल्या गैरव्यवहार व अनियमिततेमुळे सन २०१० पासून ८५ टक्के कर्जधारकांची ८०० कोटी रुपयांची कर्जे थकित असल्याने सदर महामंडळे आर्थिकदृष्टया दुर्बल झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामंडळातील कामकाजामध्ये सुधारणा करण्याकरीता समिती नेमण्यात आली आहे काय, असल्यास, समितीने सुधारणा करण्याबाबत अहवाल सादर केला आहे काय व त्यानुषंगाने तीनही महामंडळे सक्षम करण्याच्यादृष्टीने व थकीत कर्जे वसूल करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली तसेच गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, थकीत कर्जे वसूल करण्याकरीता महामंडळांकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्रादेशिक कार्यालय स्तरावर कर्ज वसुलीबाबत केंद्रीकृत कॉल सेंटरची स्थापना करून कर्जदारांना फोन, SMS, व्हॉट्सॲपद्वारे थेट संपर्क, पाठपुरावा व साप्ताहिक आढावा घेणे सुरू आहे.
२. संगणकीकृत मॉनिटरिंग प्रणाली थकबाकीदारांचा डेटा, Progress Tracking आणि MIS रिपोर्टिंगसाठी ERP डॅशबोर्ड कार्यरत आहे. वसूली कामकाजावर रिअल-टाइम नियंत्रण मिळते.
३. वसुली जागरूकता मेळावे / शिबिरे थकबाकीदारांशी प्रत्यक्ष संवाद, कायदेशीर कारवाई व दंडात्मक तरतुदींबाबत जागृती करून वसूली वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे.
४. नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना प्रोत्साहन नियमित हप्ते भरणाऱ्यांना पुनर्कर्ज किंवा सूट/सवलतींच्या संधी देऊन सकारात्मक प्रोत्साहन दिले जाते.
५. सातत्यपूर्ण फॉलोअप करण्यासाठी कॉल सेंटर सुरू करण्याची प्रक्रिया पूर्ण वेगाने सुरू आहे.

६. कायदेशीर नोटिसेस व न्यायालयीन कारवाई प्रतिसाद न देणाऱ्या कर्जदारांवर नोटिसेस बजावणे, कलम १३८ अंतर्गत कारवाई, दिवाणी दावे, इत्यादी उपाययोजना सुरू आहेत.
७. जिल्हास्तरावर वसूली नोटिस मोहीम विशेष वसूली मोहीम राबवून थकबाकीदारांवर दबाव वाढविला जात आहे.
८. शासकीय/खाजगी सेवेत कार्यरत असलेल्या जामिनदारांच्या पगारातून थेट कपात करण्यासाठी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून वसुलीबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यात हवामान केंद्र स्थापन करण्याबाबत

**(३१) * ६२०० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ५३ ग्रामपंचायतींनी हवामान विषयक अद्ययावत माहिती तात्काळ उपलब्ध होण्याकरीता तसेच आगामी काळात नैसर्गिक नुकसान रोखण्याकरीता हवामान केंद्र स्थापन करण्याबाबत कृषी विभागाकडे प्रस्ताव पाठविल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांचे पिकांचे नैसर्गिक आपत्तीने नुकसान होवू नये यासाठी हवामान विषयक अद्ययावत माहिती तात्काळ उपलब्ध होण्याकरीता तसेच आगामी काळात नैसर्गिक नुकसान रोखण्याकरीता हवामान केंद्र स्थापन करण्याबाबत उक्त ग्रामपंचायतीने कृषी विभागाकडे पाठवलेले प्रस्ताव तात्काळ मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) व (२) शासन निर्णय, कृषी विभाग, दिनांक ०८/०३/२०१७ अन्वये राज्यात महावेध प्रकल्पांतर्गत महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. शासन निर्णय, कृषी विभाग, दिनांक २७/०६/२०२५ अन्वये महावेध प्रकल्पास ५ वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे शासन निर्णय, कृषी विभाग, दिनांक २७/०६/२०२५ अन्वये महावेध प्रकल्पांतर्गत महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रे ज्या ग्रामचायतींच्या हद्दीत यापूर्वीच स्थापित आहेत, त्या ग्रामपंचायती वगळून इतर ग्रामपंचायतीच्या स्तरावर केंद्र शासनाच्या WINDS (Weather Information Network Data System) प्रकल्पाअंतर्गत स्वयंचलित हवामान केंद्रांची (AWS-Automatic Weather Station) उभारणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) भूमि अभिलेख कार्यालयाने कोरोना कालावधीत टाळेबंदी असताना जमिनीच्या शासकीय मोजण्या केल्याबाबत

**(३२) * ५१८७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याणच्या भूमि अभिलेख कार्यालयाने सन २०२०-२१ मध्ये कोरोना काळात टाळेबंदी असताना शासनाने अथवा महसूल खात्याने जारी केलेले नसतानाही तब्बल ५८७ जमिनीच्या शासकीय मोजण्या केल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काळात झालेल्या जमिनींच्या शासकीय मोजण्यासंदर्भात शासनाने चौकशी व सदरहू नस्त्यांची तपासणी करून त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) याबाबत सन २०२०-२०२१ या वर्षात कडक टाळेबंदीचा कालावधी वगळून उर्वरीत कालावधीत उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कल्याण या कार्यालयास प्राप्त मोजणी प्रकरणांमध्ये सदर कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात आलेली आहे. सन २०२०-२०२१ या वर्षात कोरोना प्रार्दुभाव असल्याने शासनाकडील वेळोवेळी निर्गमित झालेले आदेश / अधिसूचना पाहता दिनांक २५/०३/२०२० ते ३१/०५/२०२० या कालावधीत कडक टाळेबंदी लागू होती. सदर टाळेबंदीच्या कालावधीमध्ये कार्यालयाकडून जमिनीच्या मोजणीची कार्यवाही झालेली नाही.

-----------------

## पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यातील तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(३३) * ५४५४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगांव) तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी नैसर्गिक आपत्तीच्या निधीचा लाभार्थ्यांची बनावट यादी तयार करून १ कोटी २० लाख १३ हजार ५१७ रुपयांचा गैरव्यवहार केल्याची घटना दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नैसर्गिक आपत्तीच्या निधीचा लाभार्थ्यांची बनावट यादी तयार करून गैरव्यवहार करणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर निधी आपत्तीग्रस्त लाभार्थ्यांना मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पाचोरा तालुक्यातील बनावट यादीच्या अनुषंगाने पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल करतेवेळी शेतकरी अनुदान यादीत रुपये १,२०,१३,५१७/- इतक्या रकमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आले होते. परंतु सन २०२३ व सन २०२४ चे शेतकरी अनुदान याद्यांच्या पडताळणीनंतर सदरची आर्थिक अपहाराची रक्कम रुपये २,०७,५०,५९७/- असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन महसूल सहायक, तहसिल कार्यालय, पाचोरा यांनी शेतकरी नसलेल्या इसमांच्या बँक खात्यावर शेतकऱ्यांच्या अनुदानाची रक्कम वर्ग केल्याचे तसेच काही गावांचे मूळ पंचनामे गहाळ करून खोटे व बनावट पंचनामे तयार केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित महसूल सहायक व मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांचेविरूध्द पाचोरा पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर.क्र.४२८/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३३५, ३३६(२), ३३६(३), ३४०(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवून अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, जळगाव यांचेमार्फत सुरू असून, सदर प्रकरणात आतापर्यंत ०७ आरोपी असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

संबंधित महसूल सहायक, तहसिल कार्यालय, पाचोरा यांना जिल्हाधिकारी, जळगांव कार्यालयाच्या दिनांक ०१/०९/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून, त्यांचेविरूध्द दिनांक ०९/११/२०२५ रोजीच्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच संबंधित ग्राम महसूल अधिकारी, सारोळा बु., तहसिल कार्यालय, पाचोरा यांना जिल्हाधिकारी, जळगांव कार्यालयाच्या दिनांक ३०/०९/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे व संबंधित मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी, पाचोरा यांचा कार्यकाळ दिनांक ३१/०८/२०२५ रोजी समाप्त झालेला आहे.

सदर प्रकरणात ज्या चुकीच्या इसमांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली होती, त्या इसमांना अनुदानाची रक्कम शासनाच्या बँक खात्यावर परत करण्याबाबत तहसिलदार पाचोरा यांचेमार्फत नोटीसा देण्यात आल्या आहेत.

तहसिलदार, पाचोरा यांच्या अहवालानुसार, दिनांक २८/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, पाचोरा तालुक्यातील लाभार्थ्यांची संख्या ५२३६४ असून, त्यापैकी ४१७९२ शेतकऱ्यांच्या याद्या ई-पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या आहेत. तसेच १०५७२ शेतकऱ्यांच्या याद्या संमतीपत्र प्राप्त नसल्याने, मयत खातेदार, गावात आढळून न येणारे, व इतर कारणास्तव (बाहेर गावी राहणारे) या कारणास्तव ई-पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्याचे प्रलंबित आहे. अद्यापही ग्राम महसूल अधिकारी यांचेकडून पात्र शेतकऱ्यांची यादी प्राप्त होताच ई-पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्याचे काम सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे, नागपूर व गोंदिया जिल्ह्यांमध्ये वाघ व बिबट्यांचे वाढते हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३४) * ५७७७ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.दादाराव केचे, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर, खेड, जुन्नर, आंबेगाव या तालुक्यांमध्ये बिबट्याचा वावर वाढला असून सन २००१ पासून माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंत जुन्नर वन विभागाच्या हद्दीत बिबट्याच्या हल्ल्यामध्ये ५४ जणांचा मृत्यू झाल्याचे, १५४ नागरिक जखमी होऊन यापैकी अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आल्याचे तसेच या काळात बिबट्याने सुमारे २६००० पशुधनांचा बळी घेतल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्नर तालुक्यातील सहा वर्षीय मुलाचा व अकोले तालुक्यातील बेलापूर परिसरातील आदिवासी शेतमजुराचा, पिंपरखेडा (ता.शिरूर) येथे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान साडेपाच वर्षाच्या मुलीचा बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे, तसेच मौजे जऊळके खुर्द (ता.खेड, जि.पुणे) येथे गत तीन महिन्यांपासून सुरु असलेला बिबट्याचा वावर रोखण्याबाबत लोकप्रतिनिधी (वि.प.स.) यांनी मा.मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १५/१०/२०२५ रोजी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील कोंढाळी व उमरेड तालुक्यात वाघ व बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे अनेक जनावरांचा मृत्यू झाल्याने ग्रामस्थांनी वनविभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून गोंदिया जिल्ह्यातील केशोरी येथेही बिबट्याच्या हल्ल्यामुळे पाच वर्षीय बालकाचा मृत्यू झाला असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बिबट्यांपासून होणारी मनुष्यहानी व पशुहानी टाळण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) जुन्नर वनविभागात वन्यप्राणी बिबट्याच्या हल्ल्यात सन २००१ पासून माहे नोव्हेंबर, २०२५ पर्यंत ५५ व्यक्तींचा मृत्यू झालेला असून १५० व्यक्ती गंभीर जखमी झालेल्या आहेत. तसेच वन्यप्राणी बिबट्याच्या हल्ल्यात सन २००१ पासून माहे नोव्हेंबर, २०२५ पर्यंत २७९५२ पशुधनांचा मृत्यू झाला असल्याची बाब प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी कळविले आहे.
(२) व (३) जुन्नर वन विभागात वन्यप्राणी बिबट्याच्या हल्ल्यात मौ-कुमशेत, ता.जुन्नर, जि.पुणे येथे दिनांक १४/०९/२०२५ रोजी कु.सिध्दार्थ प्रविण केदारी, वय-६ वर्ष या लहान मुलाचा, तसेच मौ-पिंपरखेड, ता.शिरूर, जि.पुणे येथे दिनांक १२/१०/२०२५ रोजी कु. शिवन्या शैलेश बोंबे, वय-५ वर्ष या लहान मुलीचा मृत्यू झालेला आहे.

तसेच गोंदिया वनविभाग मध्ये दिनांक २५/०९/२०२५ रोजी गोंदिया वनविभाग, वनपरिक्षेत्र गोठणगांव, सहवनक्षेत्र गोठणगांव नियतक्षेत्र गोठणगांव वनालगत चि.अंश प्रकाश मंडल, वय-५ वर्ष, संजयनगर, ता.अर्जुनी/मोर जि.गोंदिया यांच्यावर बिबट वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे बालकाचा मृत्यू झाला आहे.

राज्यातील वाढत्या बिबट्यांच्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर विविध लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(४) जुन्नर वन विभागातील तसेच पुणे जिल्ह्यातील मानव वन्यजीव संघर्षाच्या अनुषंगाने मा.पालकमंत्री महोदय पुणे, यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५/१०/२०२५ रोजी व मा.मंत्री (वने) महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०४/११/२०२५ व १७/११/२०२५ तसेच मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १८/११/२०२५ रोजी बैठका घेऊन सविस्तर चर्चा करून त्यानुसार सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

सदर विषयाचे गांभीर्य विचारात घेता वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मध्ये सुधारणा करण्याबाबत केंद्र शासनाला प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

तथापि, प्रामुख्याने मानव-बिबट संघर्ष कमी करण्याच्या अनुषंगाने तसेच बिबट्यांपासून होणारी मनुष्यहानी व पशुहानी टाळण्यासंदर्भात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- केंद्र शासनाने बिबट्यांची प्रायोगिक तत्वावर नसबंदी करणे संदर्भात परवानगी दिली आहे. त्यास अनुसरून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
- बिबट बंदिस्त करण्यासाठी पिंजऱ्यांची संख्या वाढविणे.
- बंदिस्त बिबट्यांचे इतरत्र प्राणी संग्रहालये/संरक्षित क्षेत्रामध्ये स्थानांतरण करणे.
- माणिकडोह व राज्यातील इतर बिबट निवारा केंद्राचे विस्तारीकरण करुन क्षमता वाढविणे इ.
- AI च्या माध्यमातून कॅमेरे बसविणे, अनॉयडर्स मशिन बसविणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ठिबक सिंचनासाठी पात्र शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत

**(३५) * ५१५२ श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रति थेंब अधिक पीक योजनेत सन २०२४-२५ वर्षांकरीता नोंदणी झालेल्या सुक्ष्म सिंचन कंपन्यांच्या वितरकांची यादी सन २०२५-२६ या वर्षांसाठीदेखील ग्राह्य धरली जाणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित वितरकांची ठिबक कंपन्यांनी नोंदणी करणे अत्यावश्यक असल्यामुळे यंदा वितरक नोंदणीचे काम देखील अपूर्ण असून यामुळे सदर योजनेतील पात्र शेतकऱ्यांना अद्याप अनुदान देण्यात आले नाही, तसेच शेतकऱ्यांकडून सूक्ष्म सिंचन संच अनुदानासाठी गत आर्थिक वर्षांत पाच लाख अर्ज आले असून "प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य" या पध्दतीने यातील पहिले २ लाख २६ हजार अर्ज आता अनुदानासाठी पात्र ठरविण्यात आले असल्याने पात्र अर्जदार शेतकऱ्यांच्या शेताची पाहणी करुन त्यांनी संच बसविला आहे की नाही हे तपासावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वितरक नोंदणी पूर्ण करून शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना - प्रती थेंब अधिक पीक योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन साहित्याचा पुरवठा करण्याकरीता उत्पादकांची नोंदणी करण्यात येते. सदर नोंदणी वर्षभर करण्याचे निर्देश केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये दिलेले आहेत. सदर उत्पादक कंपन्यांची नोंदणी झाल्यानंतर जिल्हास्तरावर कंपनीच्या अधिकृत वितरकांची नोंदणी ई-ठिबक या पोर्टलवर करण्यात येते.

सन २०२४-२५ मधील सर्वसाधारण प्रवर्गाचे प्राप्त अर्ज सन २०२५-२६ मध्ये ग्राह्य धरण्यात आलेले आहेत. सन २०२४-२५ मध्ये ५२१९१९ अर्ज प्राप्त झालेले होते. त्यापैकी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील ५९,१४१ अर्जांची लॉटरी काढण्यात आली असून उर्वरित ४,६२,७७८ अर्ज सर्वसाधारण प्रवर्गाचे होते.

सन २०२५-२६ मध्ये महाडीबीटी पोर्टलवरील लाभार्थी निवड लॉटरी प्रणाली ऐवजी प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्त्वावर निवड करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत योजनेंतर्गत उपलब्ध सर्व ८,११,०८१ लाभार्थ्यांची निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्त्वावर करण्यात आलेली आहे.

महाडीबीटी पोर्टलवरील प्राप्त अर्जांच्या कागदपत्रांची छानणी करण्यात येते व त्यानंतरच संच बसविण्यास पूर्वसंमती देण्यात येते. संच बसविल्यानंतर देयके अपलोड केलेल्या लाभार्थ्यांची मोका तपासणी करण्यात येते. यानंतरच सदरील शेतकरी अनुदानासाठी पात्र ठरविण्यात येतात. सन २०२३-२४ ते २०२५-२६ मध्ये ३,११,०७८ लाभार्थी अनुदानासाठी पात्र ठरविण्यात आले होते. त्यापैकी २,५९,४१६ शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्यात आले आहेत. उर्वरित पूर्वसंमती दिलेल्या शेतकऱ्यांना व अनुदानासाठी पात्र शेतकऱ्यांना निधी उपलब्धतेनुसार अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

शेतकऱ्यांना वेळेत अनुदान उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने सन २०२४-२५ वर्षातील ६५९४ नोंदणीकृत वितरक सन २०२५-२६ वर्षाकरीता ई-ठिबक पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सन २०२५-२६ मध्ये आतापर्यंत ९७५० वितरकांची नोंदणी झाली असून सदर वितरक ई-ठिबक पोर्टलवर देखील उपलब्ध आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्तांसाठी जाहीर केलेल्या विशेष पॅकेज मध्ये वाढ करणेबाबत

**(३६)** * **५२८८ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने अतिवृष्टीग्रस्तांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांच्या विशेष पॅकेजची घोषणा केली असून सदर पॅकेज घोषित करताना एनडीआरएफमधून नुकसानी पोटी मिळणारी जवळपास साडेसहा हजार कोटी रुपये, इतर योजनांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आधीच तरतूद केलेले दहा हजार कोटी रुपये, पीक विम्याचे संभाव्य पाच हजार कोटी रुपये आणि पीक पशुधन नुकसानी पोटी एनडीआरएफच्या निकषापेक्षा राज्य सरकारने अधिकचे देवू केलेले दहा हजार कोटी रुपयांचा समावेश केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांसाठी कोट्यवधी रुपयांचे विशेष पॅकेज घोषित केले असले तरीही शेतकऱ्यांना प्रत्यक्षात नुकसान भरपाई पोटी तुटपुंजी रक्कम मिळत असल्याने राज्यभरातील शेतकरी नाराजी व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पॅकेज मध्ये वाढ करून बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) राज्यात जून ते सप्टेंबर, २०२५ या कालावधीत झालेली अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे बाधितांना महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२५/प्र.क्र. ३६५/म-३(मदत-१), दिनांक १०/१०/२०२५ अन्वये विशेष मदत पॅकेज (Relief Package) जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार मदत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सेंद्रिय उत्पादनांना परकीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी धोरण तयार करण्याबाबत

**(३७) * ४७७१ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन आणि परंपरागत कृषी विकास योजनांतर्गत आतापर्यंत अनेक शेतकरी गट आणि शेतजमिनीचे क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणले गेले असून उक्त योजनांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात आणि निव्वळ उत्पन्नात झालेला निश्चित बदल मोजण्यासाठी शासनाने कार्यक्षम परिणाम मूल्यांकन (Impact Assessment) यंत्रणा विकसित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात वेळोवेळी होणाऱ्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांचे कृषी क्षेत्रातील झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आणि त्यांना सेंद्रिय किंवा नैसर्गिक शेतीच्या पध्दतीकडे वळविण्यासाठी विशेष पुनर्संचयन (Restoration) योजना राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेंद्रीय उत्पादनांना परकीय बाजारपेठ व त्यातून शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी कृषी विभागाने धोरण किंवा योजना तयार केली आहे काय, असल्यास त्याची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यात सेंद्रीय उत्पादनांना परकीय बाजारपेठ व त्यातून शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी कृषी विभागामार्फत सेंद्रीय व नैसर्गिक शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषी विकास योजना व राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान आणि राज्य पुरस्कृत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन या योजना राबविण्यात येत आहेत. परंपरागत कृषी विकास योजनेंतर्गत सन २०२०-२१ पासून एकूण १७०० गट स्थापन करण्यात आले असून सदर गटांच्या एकूण १०३ शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन केल्या आहेत. सदर कंपन्यांचे National Programme of Organic Production (NPOP) अंतर्गत Agriculture and Processed Food Products Export Development Authority (APEDA) मार्फत सेंद्रिय प्रमाणीकरण करण्यात येत आहे. सदर प्रमाणीकरण प्रणाली राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य असून निर्यातीसाठी अनिवार्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) मधील थळ येथील जमिनीची विनापरवानगी नोंदणीकृत साठे कराराद्वारे विक्री केल्याबाबत

**(३८) * ५२११ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) मधील थळ येथील सर्व्हे नंबर ३४५/२ मधील ०/६०/७० हेक्टर जमीन जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय सन २०२३ मध्ये प्रसिध्द अभिनेता शाहरुख खान यांची मुलगी अभिनेत्री सुहाना खान हिला नोंदणीकृत साठे कराराद्वारे विक्री केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.नारायण विश्वनाथ खोटे यांना १९६८ मध्ये लागवड आणि वापरासाठी शासनाकडून जमीन देताना जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय गहाण, विक्री अथवा इतरांच्या नावावर करता येणार नाही अशी स्पष्ट अट घालण्यात आलेली असतानाही खोटे यांच्या वारसांनी सदरहू जमिनीची विनापरवानगी सन २०२३ मध्ये अभिनेत्री सुहाना खान हिला नोंदणीकृत साठे कराराद्वारे परस्पर विक्री केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय जमीन खाजगी व्यक्तींना विकून झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच शासकीय जमीन परत शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे थळ, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट क्र. ३४५/२ मधील क्षेत्र ०/६०/७० हे.आर या मिळकतीचा ॲग्रीमेंट फॉर सेल (साठेकरार) दस्त हा लिहून देणार श्रीम.अंजली खोटे, श्रीम.रेखा खोटे व श्रीम.प्रिया खोटे आणि लिहून घेणार कुमारी सुहाना शाहरूख खान यांच्यामध्ये सह दुय्यम निबंधक अलिबाग या कार्यालयात क्र.२२२४/२०२३, दिनांक ०१/०६/२०२३ अन्वये नोंदणीकृत झालेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर विषयांकित मिळकतीच्या ७/१२ वरील इतर अधिकारातील नोंदीनुसार सक्षम प्राधिकाराच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरास बंदी असे नमूद आहे. तसेच दस्तातील नमूद बाबींनुसार उक्त दस्तातील मिळकतीच्या विक्री परवानगीसाठी विक्रेते यांनी सन २०२२ रोजी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे. तथापि, विक्री परवानगी प्रलंबित असल्याने विक्रेते यांनी सदर मिळकतीचा ॲग्रीमेंट फॉर सेल (साठेकरार) नोंदणीकृत केलेला असून खरेदीखत नोंदणीकृत केलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**नागपूर.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.